# आशियाना को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी मर्या.

पहिल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

उपस्थित सभासद 28सभा दिनांक 14 सप्टेंबर 2025 सायं. 5 वा.

1) **<u>पहिल्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी अध्यक्ष यांची निवड करणे.</u>**

**<u>ठराव :</u>** सभेचे अध्यक्ष म्हणून श्री राजेश अशोक सामंत, (AL-6/1/15) यांची नियुक्ती करण्यात आली.

सूचक : श्री नारायण बाळाजी बोरुडे ( AL-6/1/14)

अनुमोदक : श्री संजय ज्ञानेश्वर धुमाळ(AL-6/3/15)

**ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

2) **<u>माननीय उपनिबंधक सहकारी संस्था / सिडको यांचे कडून मंजूर करण्यात आलेला उपविधी स्वीकारणे ..</u>**

**<u>ठराव :</u>** संस्थेच्या नोंदणीच्या वेळी माननीय उपनिबंधक सहकारी संस्था सिडको यांच्याकडून मंजूर करण्यात आलेला उपविधी नुसार संस्थेचे कामकाज करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

सूचक : श्री कुमार सिंग (AL-6/3/3)

अनुमोदक : श्री अभिजीत अशोक जाधव(AL-6/3/4)3)

3) **<u>नवीन सभासदारांकडून सभासदत्वासाठी आलेल्या अर्जाचा विचार करणे</u>**

**<u>ठराव :</u>** नवीन सभासदांकडून सभासदत्त्वासाठी एकूण ७६ अर्ज आले असून त्यांचा सभासदत्वासाठी बहुमताने मंजुरी देण्यात आली.सभासदांची नावे खालील प्रमाणे (यादी सोबत जोडण्यात आली आहे.)

४) **<u>संस्थेच्या कार्यकारी मंडळाची निवड करणे</u>**

**<u>ठराव</u>** : संस्थेची हंगामी व्यवस्थापन समितीतील कार्यकारी मंडळाची संख्या म स स अ १९६०चे कलम 73 ब व 73 अन्वये तरतूद केल्याप्रमाणे आरक्षित सदस्यांची नियुक्ती खालील प्रमाणात करण्यात आली आहे.

1 श्री संजय ज्ञानेश्वर धुमाळ (सर्वसाधारण)

2 २ श्री हरिभाऊ नारायणराव धानुरकर (सर्वसाधारण)

3 श्री.किशोर मनोहर पेंढारकर (सर्वसाधारण)

श्री. राजेश अशोक सामंत
अध्यक्ष
पहिली सर्वसाधारण सभा

4 श्री. राजेश अशोक सामंत (सर्वसाधारण)

5 श्री. राममुर्ती अलगुराम शुक्ला (सर्वसाधारण)

6. श्री.मनोज दुर्गादास कुलकर्णी (सर्वसाधारण)

7. सौ.सुनीता राजेंद्र जोशी (महिला )

8 सौ.सुवर्णा दशरथ दळवी (महिला )

9)श्री दिनेश लक्ष्मण दरवेश (अनुसूचित जाती व जमाती)

10) श्री.नारायण बाळाजी बोरुडे (इतर मागासवर्गीय)

11) **वि. जा. / भ. ज. /वि. मा. प्र. साठी उमेदवार उपलब्ध न झाल्याने पद रिक्त ठेवण्यात आले आहे.**

सूचक : श्री किशोर चंद्रकांत मंत्री .( AL-6/4/15)

अनुमोदक : श्री स्टीवन डिसूजा (AL-6/4/2)

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

अ ) संस्थेचे कार्यकारी समितीचे अध्यक्ष म्हणून श्री नारायण बाळाजी बोरुडे यांची सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली.

सूचक : श्री संजय ज्ञानेश्वर धुमाळ (AL-6/3/15)

अनुमोदक : श्री हरिभाऊ नारायणराव धानुरकर(AL-6/1/8)

ब ) संस्थेचे कार्यकारी समितीचे सेक्रेटरी म्हणून श्री संजय ज्ञानेश्वर धुमाळ यांची सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली.

सूचक : श्री नारायण बाळाजी बोरुडे (AL-6/1/14)

अनुमोदक : श्री हरिभाऊ नारायणराव धानुरकर(AL-6/1/8)

क) संस्थेचे कार्यकारी समितीचे खजिनदार म्हणून श्री हरिभाऊ नारायणराव धानुरकर यांची सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली.

सूचक : सौ सुनीता राजेंद्र जोशी( AL-6/2/11)

अनुमोदक : श्री दिनेश लक्ष्मण दरवेश(AL-6/4/4)

५) संस्था इमारत देखभाल खर्च व भविष्यात इमारतीची दुरुस्तीसाठी सिंकिंग पण फंड ठरवणे संस्थेचे इमारत देखभाल खर्च व भविष्यात इमारतीची दुरुस्तीसाठी सिंकिंग फंड ठरवणे बाबतचा निर्णय कार्यकारी मंडळाने संस्थेचे दैनंदिन व्यवहार

श्री. राजेश अशोक सामंत
अध्यक्ष
पहिली सर्वसाधारण सभा

पाण्यासाठी येणार खर्च व इतर खर्च सर्व खर्चाचा अंदाज घेऊन उपविधीनुसार आकारणी करून ठराव मंजूर करण्यात यावे असे ठरले.

सूचक : श्री ई बी नायर (AL-6/2/5)

अनुमोदक : श्री मदन महादेव शेळके( AL-6/3/1)

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

६) **<u>महाराष्ट्र जिल्हा सहकारी बँक वाशी मध्ये मुख्य प्रवर्तकाच्या नावे असलेले खाते संस्थेच्या नावे वर्ग करणे बाबत .</u>**

**<u>ठराव:</u>** संस्थेचे मुख्य प्रवर्तक श्री नारायण बाळाजी बोरुडे यांच्या नावे ती महाराष्ट्र जिल्हा सहकारी बँक वाशी मध्ये उघडण्यात आलेले सेविंग खाते संस्थेच्या नावे वर्ग करण्यात यावे व संस्थेचे अध्यक्ष ,सेक्रेटरी, खजिददार यापैकी दोघांना सहीची अधिकार देण्यात यावेत असे सर्वानुमते ठराव करण्यात आला. तसेच संस्थेच्या नावे नवीन खाते सोसायटीच्या जवळ युनियन बँक ,ऐरोली. या बँकेत बचत खाते खोलून संस्थेचे दैनंदिन व्यवहार पहावेत. सदर खात्यावर अध्यक्ष, सेक्रेटरी व खनिज पैकी दोघांच्या सहीने व्यवहार करण्यात सर्वानुमते ठरवण्यात आले.

सूचक : श्री लक्ष्मीकांत खोले, (AL-6/1/5)

अनुमोदक : दशरथ मारुती दळवी (AL-6/1/2)

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

७) संस्थेचे हिशोब तपासण्यासाठी अंतर्गत हिशोब तपासणीचा ची निवड करणे.

**<u>ठराव :संस्थेचे हिशोब तपासण्यासाठी अंतर्गत हिशोब तपासणीची निवड करणे बाबतचे अधिकार कार्यकारी मंडळाला देण्यात येत आहेत.</u>**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

सूचक : श्री किशोर मंत्री (AL-6/3/16)

अनुमोदक : श्री चंद्रमोहन रावत(AL-6/2/13)

८) **<u>आशियाना अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन व मुख्य प्रवर्तक यांचे आर्थिक व्यवहार जुन्या समितीकडून दिनांक 30/ 9/ 2025 पर्यंत हाताळले जातील व आर्थिक कार्यभार</u>**

श्री. राजेश अशोक सामंत
अध्यक्ष
पहिली सर्वसाधारण सभा

नवीन सहकारी गृहनिर्माण संस्थेकडे दिनांक 1/10 /2025 रोजी हस्तांतरित केला जाईल.

ठराव सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सूचक : सुप्रिया प्रथमेश बोरुडे (AL-6/3/8)

अनुमोदक : स्टीवन डिसूजा(AL-6/4/2)

९) **<u>संस्थेचे शासकीय हिशोब तपासणीस नेमणे .</u>**

**<u>ठराव :</u>** श्री. ई .ए .पाटील आणि असोसिएट यांची संस्थेचे शासकीय हिशोब तपासणी म्हणून नेमणूक करण्यात येत आहे असा ठराव झाला.

सुचक : श्री मदन महादेव शेळके (AL-6/3/1)

अनुमोदक : श्री तुषार दिवाकर वराडकर(AL-6/2/14)

१०) **नवी मुंबई सहकारी गृहनिर्माण संस्था असोसिएशन / फेडरेशन मध्ये संस्थेच्या नावाने सभासदत्व घेणे.**

ठराव: नवी मुंबई सहकारी गृहनिर्माण संस्था असोसिएशनमध्ये सोसायटीच्या नावे सभासदत्व घेणे.व त्यासाठी लागणारे शुल्क व कागदपत्रांची पूर्तता कार्यकारी मंडळाने करून घ्यावी असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक : सौ. सुनिता राजेंद्र जोशी (AL-6/2/11)

अनुमोदक : सौ. सुवर्णा दशरथ दळवी(AL-6/1/4)

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

११) **संस्थेच्या इमारतीची जागा सिडकोकडून संस्थेच्या नावे हस्तांतरित (सप्लीमेंट्री लीज डिड) करणे बाबत .**

**<u>ठराव :</u>** संस्थेच्या इमारतीची जागा सिडको कडून संस्थेच्या नावे हस्तांतरित करणे करता ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. त्याबाबत संस्थेचे अध्यक्ष. श्री .नारायण बाळाजी बोरुडे ,सेक्रेटरी श्री .संजय ज्ञानेश्वर धुमाळ व खजिनदार श्री .हरिभाऊ नारायणराव धानुरकर यांना अधिकार देण्याचा
ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

श्री. राजेश अशोक सामंत
अध्यक्ष
पहिली सर्वसाधारण सभा

सूचक : स्टीवन डिसोजा (AL-6/4/2)

अनुमोदक : ऐ बी नायर(AL-6/2/5)

12) **आशियाना अपार्टमेंट ओनर्स असोसिएशनच्या सर्वसाधारण सभेत या पुर्वी बहुमताने घेण्यात आलेले सर्व निर्णय यापुढे आशियाना सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित ला लागू राहतील परंतु असे निर्णय जे महाराष्ट्र सहकारी गृहनिर्माण संस्था अधिनियम नियम व उपविधी यांच्या तरतुदीची विसंगत नसतील.**

**ठराव : सर्वानुमते मंजूर करण्यात आला**

सूचक : श्री. राममुर्ती अलगुराम शुक्ला (AL-6/1/5)

अनुमोदक : श्री दशरथ दळवी(AL-6/1/1)

13) अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या विषयावरती चर्चा करणे .अध्यक्षांच्या परवानगीने खालील विषयावरती चर्चा झाली.अ ) ए एल सिक्स टाइपच्या इमारतींचा पुर्नविकासासाठी चार गृहनिर्माण संस्था

१) आशियाना को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी .

२) ओंकार को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी

३) मयंक ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी

४) वनराई को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी यांनी एकत्रित पुर्नविकास करण्याबाबत प्रयत्न चालू असून त्यासाठी त्यावर अभ्यास करण्यासाठी प्रत्येक सोसायटीतील तीन प्रतिनिधींची अधिकृत नियुक्ती करणे बाबतचे ठरवण्यात आले असून आपल्या आशियाना सोसायटी तर्फे अध्यक्ष. श्री नारायण बाळाजी बोरुडे सेक्रेटरी. श्री. संजय ज्ञानेश्वर धुमाळ व श्री किशोर मनोहर पेंढारकर अशा तीन जणांची नियुक्ती करण्याचे सर्वानुमते ठरवण्यात आले.

सूचक : श्री मनोज दुर्गादास कुलकर्णी (AL-6/4/1)

अनुमोदक : श्री किशोर चंद्रकांत मंत्री(AL-6/4/16)

**ठराव** : सर्वानुमते मंजूर करण्यात आला.सदर सभेमध्ये अजून कोणतेही मुद्दे चर्चेसाठी नसल्यामुळे अध्यक्षांनी सभासद सभेचे आभार व्यक्त करून सभा संपली असे जाहीर केले.

श्री. राजेश अशोक सामंत
अध्यक्ष
पहिली सर्वसाधारण सभा